सकाळ. TODAY | सिंधुदुर्ग, शुक्रवार, ६ मे २०२२

# 'महाविद्यालयीन उपक्रमांचा लाभ समाजालाही व्हावा'

दोडामार्ग, ता. ५ : 'महाविद्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या बेस्ट प्रॅक्टिसेस समाजापर्यंत पोहोचविल्या पाहिजेत. महाविद्यालयीन उपक्रमांचा फायदा समाजालाही झाला पाहिजे,' असे मत संगमनेर पालिका कला, डी. जे. मालपाणी वाणिज्य आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. श्रीहरी पिंगळे यांनी व्यक्त केले. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीतर्फे राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद, बंगळूर पुरस्कृत 'रिव्हाईस्ड ॲक्रिडिटेशन फ्रेमवर्क फॉर असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडिटेशन ऑफ ॲफिलिएटेड कॉलेजेस' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय सेमिनारमध्ये बीजभाषक वक्ते म्हणून ते बोलत होते.

प्रा. पिंगळे यांनी बीजभाषणात महाविद्यालयांनी बेस्ट प्रॅक्टिसेसची निवड कशी करावी, याविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद, बंगलोर यांच्या बदललेल्या मूल्यांकनाच्या पद्धतीची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, अंतर्गत गुणवत्ता हमी समितीच्या समन्वयकांना व्हावी, या उद्देशाने या ई- सेमिनारचे आयोजन केले होते.